Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६, अंक ५] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी १३-१९, २०२०/माघ २४-३०, शके १९४१ [पृष्ठे १०, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ–नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १९.

**संचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक डिटीपी-२४७९-३११९-वि.यो. कळमेश्वर (सु. + वा. क्षे.)-आ.क्र. १०,११-कलम १२७(२)-टिपीव्ही-२-१०७-२०२०.––

ज्याअर्थी, कळमेश्वर नगर परिषदेची विकास योजना, (सु. + वा. क्षे.) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे “ उक्त अधिनियम ” असे उल्लेखिलेले आहे) चे कलम ३१(१) अन्वये अधिसूचना क्रमांक डीपी कळमेश्वर (सु. + वा. क्षे.)-टीपीव्ही-२-४२८७, दिनांक २१ जुलै १९९२ अन्वये मंजूर केली आहे व ती दिनांक १-१०-१९९२ पासून अंमलात आलेली आहे. (यापुढे “ उक्त विकास योजना ” म्हणून संबोधिलेली) या मंजूर विकास योजनेसाठी कळमेश्वर नगर परिषद, कळमेश्वर हे नियोजन प्राधिकरण आहे. (यापुढे “ उक्त नियोजन प्राधिकरण ” असे उल्लेखिलेले आहे );

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौ. कळमेश्वर येथील स.क्र. ८७४ (पै), ८७५ (पै), ९०७ (पै), या जागेवर आरक्षण क्रमांक १० “ डिस्पेंसरी ” क्षेत्र ०.३५ हेक्टर व आ. क्र. ११ “ दुकान केंद्र ” क्षेत्र ०.३६ हेक्टर (यापुढे “ उक्त आरक्षणे ” असे उल्लेखिलेले आहे) यासाठी प्रस्तावित करण्यात आले असून, सदर आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण “ नगर परिषद कळमेश्वर ” (यापुढे “ उक्त समुचित प्राधिकरण ” असे उल्लेखिलेले आहे) आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेमध्ये मौ. कळमेश्वर स.नं. ८७५ क्षेत्रफळ ११०००.०० चौ.मी. ही जमीन आ.क्र. १०, “ डिस्पेंसरी ” व आ. क्र. ११, “ दुकान केंद्र ” या आरक्षणाने व उत्तर-दक्षिण १८.० मी. रुंद विकास योजना रस्त्याचे प्रस्तावाने बाधीत होत आहेत व उर्वरित क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट आहे. (यापुढे “ उक्त आरक्षण ” असे उल्लेखिलेले आहे) सदर आरक्षणासाठी कळमेश्वर नगर परिषद हे समुचित प्राधिकरण आहे ;

आणि ज्याअर्थी, मौ. कळमेश्वर स.नं. ८७५ च्या जमीन मालकांनी उक्त मंजूर विकास योजनेमधील १८.० मी. रुंद विकास योजना रस्त्याखालील २३४०.० चौ.मी. क्षेत्र दिनांक ५-१०-२००७ रोजीच्या करारान्वये कळमेश्वर नगर परिषदेस स.नं. ८७५ च्या उर्वरित क्षेत्रांवरील आरक्षणे वगळण्याच्या अटीवर विनामोबदला हस्तांतरीत केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, कळमेश्वर नगर परिषदेने त्यांचे सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक ५, दिनांक ७-९-२००७ अन्वये उक्त जागेवरील उक्त आरक्षण क्रमांक ११ वगळणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये ठराव पारीत केले असून मुख्याधिकारी, कळमेश्वर

नगर परिषद यांनी पत्र क्र. ९०/०८, दिनांक २६-५-२००८ रोजीच्या प्रस्तावान्वये उक्त जागेवरील उक्त आरक्षणे वगळण्याचा फेरबदल प्रस्ताव अंतिम मंजुरीस्तव शासनास सादर केलेला होता ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांखाली जागा उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या कालावधीत संपादित केलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील संबंधित जमीन मालकांनी श्री. मनोहर गंगाधर घाडगे यांनी उक्त समुचित प्राधिकरणावर दिनांक २१-२-२०१२ रोजी उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) अन्वये खरेदी सूचना बजावलेली होती ;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्रमांक २४, दिनांक १७-१-२०१३ अन्वये उक्त आरक्षणाखालील उक्त जागा संपादित न करण्याचा ठराव केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील जागेच्या जमीन मालकांनी उक्त अधिनियमाचे कलम १२७ अन्वये सूचना बजाविल्यानंतरही विहीत मुदतीत भूसंपादनाची कार्यवाही केलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखाली जागेच्या धारकांनी मा. उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ५६१४-२०१८ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक १७-१०-२०१९ रोजी आदेश पारीत केलेला आहे. त्यानुसार प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी सह संचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांचे दिनांक १९-६-२०१५ रोजीच्या पत्रामधील शिफारशींच्या अनुषंगाने आदेशाच्या दिनांकापासून चार आठवड्याच्या मुदतीत उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) अन्वयेची अधिसूचना निर्गमित करणेबाबत निर्देश दिलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, शासन नगर विकास विभागाकडील पत्र क्रमांक एचसीआर-३०१९-१२९३-प्र.क्र.-१९८-२०१९-नवि-९, दिनांक ६-१२-२०१९ चे पत्रान्वये उक्त जागेवरील उक्त आरक्षणे व्यपगत झाल्याची कलम १२७(२) अन्वयेची अधिसूचना निर्गमित करणेबाबत कळविलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जागेवरील उक्त आरक्षणाबाबतचा घटनाक्रम पाहता उक्त जागेवरील उक्त आरक्षणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७(२) अन्वये व्यपगत झाल्याबाबतची अधिसूचना निर्गमित करणे आवश्यक झाले आहे असे, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्रमांक टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र.५०८-नवि-१३, दिनांक १-१२-२०१६ अन्वये सर्व नगर पालिका/नगर पंचायती आणि जिल्हा परिषद, नियोजन प्राधिकरण असलेल्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) खालील अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम १२७(२) अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, याद्वारे खालील नमूद केल्यानुसार उक्त आरक्षणे उक्त जागेपुरते (भागशः) व्यपगत झाली आहेत आणि त्यासाठी दिनांक २१-७-१९९२ च्या अन्वये विकास योजना मंजूर केलेल्या अधिसूचनेमध्ये पुढे दिल्याप्रमाणे सुधारणा करीत आहेत ;

उक्त विकास योजना मंजुरीच्या अधिसूचनेच्या शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.—

" मौजे कळमेश्वर स.क्र. ८७५ वरील उक्त मंजूर विकास योजना, कळमेश्वर (सु. + वा. क्षे.) मधील आरक्षण क्रमांक १०, "डिस्पेंसरी" क्षेत्र ०.३५ हेक्टर व आ.क्र.११, "दुकान केंद्र" क्षेत्र ०.३६ हेक्टर या आरक्षणातील नोटीसीमध्ये नमूद जमीन व्यपगत झाल्याचे अधिसूचित करित असून सदर आरक्षण मुक्त झालेली जागा लगतच्या जमिनीवर उक्त विकास योजनेनुसार अन्यथा अनुज्ञेय होणा-या विकासाच्या प्रयोजनासाठी जमीन मालकास विकासाकरिता उपलब्ध होईल. "

**टीप.—** (१) वरील बदल दर्शविणारा विकास योजनेचा भाग नकाशा मुख्याधिकारी, नगर परिषद, कळमेश्वर यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ खुला ठेवण्यात येत आहे.

(२) सदर आदेश संचालनालयाच्या संकेतस्थळावर **www.dtp.maharashtra.gov.in** देखील प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**नो. र. शेन्डे,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक ७ जानेवारी २०२०.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २०.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

No. D.T.P.-2479-3119-DP-Kalameshwar-(R.+A.A)-Site No. 10 & 11-Sec.127(2)-TPV-2-107-2020.—

Whereas, the Development Plan (Revised + Additional Area) of Kalameshwar Brahmani Municipal Council has been Sanctioned under the Provisions of Section 31(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* their Notification No. DP-Kalmeshwar (R. + AA)-TPV-2-4287, dated 21-7-1992 and came into force *w.e.f.* dated 1-10-1992 (hereinafter referred to as "the said Development Plan") ; and the kalmeshwar Municipal Council, Kalmeshwar is the Planning Authority for said Development Plan (hereinafter referred to as "the said Planning Authority") ;

And whereas, in the said Development Plan, land bearing S. No. 874 (pt), 875 (pt), & 907 (pt), having area 3500.00$m^2$ is reserved for Site No. 10 "Dispensory" & land bearing S. No. 875 (pt), & 907 (pt), having area 3600.00$m^2$ is reserved for Site No. 11, "Shopping Centre" & Kalmeshwar Municipal Council is the Appropriate Authority (hereinafter referred as "the said Appropriate Authority"), for the said reservations, (hereinafter referred as "said reservations");

And whereas, in the said Development Plan Site No. 10,Dispensary having an area of 3500.0 mt Sq on lands bearing S. No. 874(pt), 875(pt) & 907 (pt) And Site No. 11, "Shopping Center", having an area of 3600.0 mt. Sq on lands bearing S. No. 875 (pt) & 907 (pt) are proposed for above Public amenities ;

And whereas, in the said Development Plan, the land bearing Khasara No./Survey No. 875 area ameasuring 11000.00 Sq.mt. of Mauje Kalmeshwar (hereinafter referred to as "the said land") is reserved as Site No. 10, "Dispensary" (Partly), Site 11, "Shopping Center" (Partly), 18.0 mtr. North-South Development Plan Road, (hereinafter referred to as "the said reservations") and remaining area is under Residential Zone. Kalmeshwar Municipal Council, is the Appropriate Authority, for the said reservations (herein after referred to as "the said Appropriate Authority".)

And whereas, the owner of the said land has handed over the 2340.00 Sq.mt area under 18.0 mtr wide North-South Development Plan Road to the Kalmeshwar Municipal Council on dt 5-10-2007 by an agreement in *lieu* of releasing the balance land under the said reservations ;

And whereas, the land has not been acquired by the said Authority within ten years from the date on which the said Development Plan came into force ;

And whereas, the owners of the said land *i.e.*, Shri Manohar Gagadhar Gadge has issued a notice dated 21-2-2012 under Section 127(*1*) of the said Act (hereinafter referred as "the said Notice") on the said Authority ;

And whereas, even after serving of the said Notice as aforesaid, the said land has not acquired within a stipulated period from the date of service of the said notice under sub-section (*1*) of the Section 127 of the said act, by the said authority ;

And whereas, the owners of the said land has filed an Writ Petition No. 5614/2018 in Hon'ble High Court of Judicature at Bombay, Bench at Nagpur ;

And whereas, the Hon'ble High Court of Judicature at Bombay, Bench at Nagpur in its decision dated 10th October 2019, in Writ Petition No. 5614/2018 in this regard, directed the Principal Secretary, Urban Development Department to issue Notification under Section 127(*2)* of MRTP Act, in terms of the recommendations of Joint Director, Town Planning, Nagpur Division, Nagpur contained in the letter dated 19th June 2015 and issue the notification within a period of four weeks from Today ;

And whereas, Government in Urban Development Department *vide* letter No. HCR-3019-1293-CR-198-2019-UD-9, dt 6-12-2019 has communicated directorate to notify lapsing of the said reservations on the said land under Section 127(*2*) of the said act;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the notification under Section 127(*2*) of the said act, regarding the lapsing of the said reservation on the said land ;

And whereas, the Government in Urban Development Department, *vide* Resolution No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 1-12-2016 has delegated the powers exercisable by it under Section 127(*2*) of the said Act to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune in respect of Development Plans of all Municipal Councils/Nagar Panchayats and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority ;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune hereby notify the lapsing of the said reservations partly in respect of the said land u/s 127(*2*) of the said Act and for that purpose amends the notification of the said Develpment Plan, sanctioned dated 21-7-1992 as follows :-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the Notification of the said sanctioned Development Plan, the following new entry shall be added :-

"Site No. 10 and Site No. 11 reserved as "Dispensary" and "Shoppingo Center" respectively in respect of S. No. 875 of Mouje Kalmeshwar, is lapsed Partly for the area contained in said notice from the above said reservation and the land so released from the reservations shall become available to the owners for the purpose of development as other-wise permissible of adjacent land under the relevant Plan."

*Note :*-(1) A copy of the Part Plan of the said Development Plan showing the aforesaid Modification shall be made available for inspection in the office of Kalmeshwar Municipal Council, Kalmeshwar during office hours on all working days.

(2) This Order shall also be published on the Directorate website. *www.dtp.maharashtra.gov.in*

Pune :
Dated the 7th January 2020.

N. R. SHENDE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २१.

**संचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.**

**आदेश**

क्रमांक डिटीपी-१२३५६-३२१९-वि.यो. तुमसर-आ. क्र. १-कलम-५०-२०१६-टिपीव्ही-२-३४२-२०२०.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधिलेले आहे) कलम ३१(१) अन्वये तुमसर या 'ब ' वर्ग नगर परिषदेची विकास योजना (यापुढे " उक्त विकास योजना " म्हणून संबोधिलेले आहे) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अधिसूचना क्रमांक डीपी-तुमसर (सुधा)-टिपीव्ही-२-४९६१, दिनांक २०-८-१९९२ अन्वये मंजूर केली आहे व ती दिनांक १-११-१९९२ पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत मौ. तुमसर येथील गट क्रमांक १४५८(पै.), १४५९(पै.), १४६० (पै.), १४६१ (पै.), १४६४ (पै.), १४६५ (पै.), १४६६ (पै.) एकूण क्षेत्र १.८० हे. आर क्षेत्र आरक्षण क्रमांक-१ " पोलीस विभाग " (यापुढे " उक्त आरक्षण " असे संबोधिलेले आहे) यासाठी प्रस्तावित करण्यात आले असून सदर आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण पोलीस अधीक्षक, भंडारा (Suprintendent of Police, Bhandara) हे आहेत ; (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिलेले आहे) ;

आणि ज्याअर्थी, जागा मालक श्री. फुलचंद बडवाईक व इतर यांचेवतीने ॲड कृष्णा. एस. मोटवानी यांनी दिनांक २९-५-२०१३ व दिनांक २३-९-२०१३ च्या पत्रान्वये तुमसर नगर परिषद व समुचित प्राधिकरण पोलीस अधीक्षक, भंडारा यांच्यावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिलेले आहे) च्या कलम १२७ अन्वयेची नोटीस बजावली होती ;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरण यांनी दिनांक ३१-५-२०१६ च्या पत्रान्वये या संचालनालयास उक्त जागेवरील उक्त आरक्षण पोलीस विभाग, तुमसर, यांना आता आवश्यक नसल्याचे कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १२७(२) अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांनी आदेश क्रमांक वियो-तुमसर-आ.क्र-१-कलम-१२७(२)-आदेश-टीपीव्ही-२-११७०, दि. ८-३-२०१७ अन्वये मौ. तुमसर येथील गट क्रमांक १४५९(पै.), १४६० (पै.), १४६१ (पै.), १४६४ (पै.) एकूण क्षेत्र १.०६ हे. आर, या जागेवरील आरक्षण क्रमांक-१, " पोलीस विभाग " हे आरक्षण (भागशः) व्यपगत झाल्याचे घोषित केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाचे दिनांक ३१-५-२०१६ चे पत्रानुसार मौ. तुमसर येथील गट नं. १४५८(पै.), १४६५(पै.), १४६६ पैकीच्या उर्वरित क्षेत्रावरील आरक्षण वगळणेबाबत कलम ५०(२) अन्वयेचे आदेश निर्गमित करण्यासाठी तत्वतः मान्यता झाल्यानुसार संचालनालयाचे पत्र क्र. १२५२, दिनांक ९-३-२०१७ रोजीच्या पत्रान्वये शासनाचे दिनांक २०-४-२०१६ च्या निदेशानुसार अधिसूचना निर्गमित करतांना जमीन वापरामध्ये होणा-या बदलाकरीता जमिनीच्या वार्षिक बाजारमूल्यदर तक्त्यातील (Annual Statements Rates) संबंधित जमीन मूल्यदराच्या ५% दराने अधिमूल्य जमीन मालकांकडून वसूल करून शासनास व तुमसर नगरपरिषदेस भरणा केलेल्या चलनाच्या छायाप्रती संचालनालयास सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते ;

आणि ज्याअर्थी, दिनांक २०-४-२०१६ रोजीच्या शासन निदेशानुसार गट नं. १४५८ पै, १४६५ पै, १४६६ पैकीच्या जागेतील फक्त गट नं. १४५८ पै या जागेचे जमीनधारक श्री. उमाशंकर गोपालकृष्ण अग्रवाल यांनी त्यांचे मालकीचे मौ. तुमसर गट क्रमांक १४५८ पैकी, आरक्षणाखालील ०.१३ हेक्टर क्षेत्रासाठी सन २०१९ या वर्षातील बाजारमूल्य दर तक्त्यानुसार येणा-या जमीन मूल्याच्या ५% दराने येणा-या अधिमूल्य रकमेपैकी ५०% शासनास देय असलेली अधिमूल्याची रक्कम रुपये ६१५७० नगर रचनाकार, भंडारा शाखा यांचेकडील लेखाशिर्षामध्ये दिनांक २८-५-२०१९ रोजी आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५०% अधिमूल्याची रक्कम रुपये ६१५७० मुख्य अधिकारी, नगर परिषद, तुमसर यांचेकडे दिनांक २७-६-२०१९ रोजी जमा केली असल्याचे नगर रचचनाकार, भंडारा शाखा यांनी पत्र क्र. ८१२, दिनांक २४-७-२०१९ अन्वये संचालनालयास कळविले आहे तसेच विभागीय सहसंचालक, नागपूर विभाग यांनी दिनांक २३-९-२०१९ चे पत्राद्वारे अधिमूल्याची रक्कम जमा केल्याबाबत चलनाच्या छायाप्रती संचालनालयास सादर केल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, समुचित प्राधिकरण व नियोजन प्राधिकरण यांनी कळविल्यानुसार व आवश्यक ती चौकशी केल्यानंतर उक्त आरक्षणाची त्यांना आवश्यकता नसल्याची खात्री पटल्यावरुन उक्त जागा उक्त आरक्षणामधून वगळणे आवश्यक असल्याचे संचालक, नगर रचना यांचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्रमांक टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र. ५०८-नवि-१३, दिनांक १-१२-२०१६ अन्वये सर्व नगरपालिका/नगर पंचायती आणि जिल्हा परिषद नियोजन प्राधिकरण असलेल्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम ५०(२) खालील अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ५०(२) अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, याद्वारे गट क्रमांक १४५८ (पै), १४६५ (पै), १४६६ (पै), या जमिनीपैकी गट क्रमांक १४५८ (पै) क्षेत्र ०.१३ हे. जागेवरील उक्त आरक्षण (भागशः) वगळण्यास मंजुरी देत आहेत आणि त्यासाठी दिनांक २०-८-१९९२ च्या अन्वये मंजूर केलेल्या अधिसूचनेमध्ये पुढे दिल्याप्रमाणे सुधारणा करीत आहेत.

उक्त विकास योजना मंजुरीच्या अधिसूचनेच्या शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :-

" मौ. तुमसर येथील गट क्रमांक १४५८ (पै), १४६५ (पै), १४६६ (पै) या जागेवरील आरक्षण क्रमांक १, पोलीस विभाग यापैकी गट क्र. १४५८ (पै) च्या ०.१३ हे जागेवरील आरक्षण सोबतच्या मंजूर विकास योजनेच्या भाग नकाशावर दर्शविल्याप्रमाणे उक्त आरक्षणातून वगळण्यात (भागशः) येत आहे ".

हा बदल अधिसूचनेसोबत जोडलेल्या भाग नकाशावर हिरव्या रंगाने दर्शविण्यात आला आहे.

**टीप :** वरील बदल दर्शविणारा विकास योजनेचा भाग नकाशा तुमसर नगर परिषदेच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ खुला ठेवण्यात येत आहे.

पुणे :
दिनांक २२ जानेवारी २०२०.

**नो. र. शेन्डे,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २२.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*ORDER*

No. DTP-12356-3219-DP-Tumsar--Site No.1-Sec 50(2)-TPV-2-342-2020.—

Whereas, the Revised Development Plan of Tumsar (hereinafter referred to as the "said Development Plan") under Section 31(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") has been sanctioned by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* its Notification No. DP-Tumsar (Revised)-TPV-ii-4961, dated 20-8-1992 has came into force *w.e.f.* 1-11-1992 ;

And whereas, in the said Development Plan, G. No. 1458(P), 1459 (P), 1460 (P), 1461 (P), 1464 (P), 1465 (P), 1466 (P) having Area of 1.80 hect. of Tumsar are reserved for Site No. 1 " Police Department " (hereinafter referred to as the "said reservation") for which Maharashtra State "Superintendent of Police, Bhandara" is the Appropriate Authority ;

And whereas, Adv. Krishna Motavani on behalf of the land owner Phulachand Budwaik and others has served a Notice u/s 127 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") dated 29-5-2013 and dated 23-9-2013 upon Tumsar Municipal Council and the Appropriate Authority (*i.e.* Superintendent of Police, Bhandara) ;

And whereas, Superintendent of Police, Bhandara *vide* it's letter dated 31-5-2016 submitted the proposal for deletion of the said reservation on the said land under Section 50 of the said Act to this Directorate ;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* Order No. D.T.P.-34-3217-D.P. Tumsar-Sec-127(*2*)-Order-TPV-2-1170, dt 8-3-2017 has notified about lapsing of said reservation (Partly) on the said lands G. No. 1458(P), 1459 (P), 1460 (P), 1461 (P), 1464 (P), 1465 (P), 1466 (P) area 1.06 Hect. Under Section 127(*2*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 ;

And whereas, considering the request of Superintendent of Police, Bhandara (*i.e.* Appropriate Authority) *vide* letter dated 31-5-2016 it is in principle agreed to delete the reservation on remaining lands bearing G.No. 1458 (P), 1465 (P), and 1466 (P) under Section 50(*2*) of said Act and communicated to Tumsar Municipal Council, *vide* letter No. 1252 date 9-3-2017 to deposit the amount of 5% Premium to concern land owners as per the rate of concern lands in annual statement of rates to Bhandara branch office and Tumsar Municipal Council and to submit the copies of challans to the directorate ;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Tumsar and Town Planner, Bhandara Branch *vide* their letter dated 29-6-2019 and 24-7-2019 respectively communicated that as per the Government directives dated 20-4-2016, out of the said reservation the land owner Shri Umashankar Gopalkrishna Aggrawal of G. No. 1458 (Part) hav deposited Rs. 61,570 towards the 50% Government share of 5% premium amount of land value for an area 0.13 hectare, as per the rate prescribed in the Annual Statement of Rates (ASR) for the year 2019 in the Government Treasury on 28-5-2019 through the Town Planner, Bhandara Branch and remaining 50% of the 5% premium amount Rs. 61,570 payable to the Planning Authority, has been deposited ;

And whereas, the Government in Urban Development Department *vide* Resolution No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 1-12-2016 has delegated the powers exercisable by it under Section 50(*2*) of the said Act to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune in respect of Development Plans of all Municipal Councils, Nagar Panchayat and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority.

And whereas, Tumsar Municipal Council is 'B' Class Municipal Council.

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune hereby sanctions the deletion of the said land from the said reservation (Partly) of "Police Department" Site No. 1 under Section 50(*2*) in respect of G. No. 1458 (Part) and for that purpose amends the Notification sanctioning the said Development Plan, dated 20-8-1992 as follows :-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the notification sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added :-

"Out of Site No. 1, "Police Department" on the lands bearing G. No. 1458 (P), 1465 (P), 1466 (P) the area admeasuring 0.13 Hect. of land bearing G. No. 1458 (P) is deleted (Partly) from the reservation as shown on the sanctioned Development Plan of Tumsar.

The Modification is shown in Green colour on the part plan accompanying this Notification.

*Note* : The copy of the part plan of the said Development Plan showing the aforesaid deletion is available for inspection in the office of Tumsar Municipal Council during office hours on all working days.

Pune :
Dated the 22nd January 2020.

N. R. SHENDE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिध्द झालेली आहे.**

८

**सोमवार, जानेवारी २०, २०२०/पौष ३०, शके १९४१**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २३.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**आदेश**

क्रमांक कार्या-१०-नविशा-कार्यासन-१-निवड-१२–२०२०.—

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १९(१) व ५१अ-१ अ(९) चे अधिकाराचा वापर करून मी, राहुल कर्डिले, जिल्हाधिकारी, चंद्रपूर या प्रगटनाद्वारे असे जाहीर करतो की, गडचांदूर नगर परिषदेच्या दिनांक ०९ जानेवारी २०२० रोजी घेण्यात आलेल्या अध्यक्ष पदासाठीच्या थेट निवडणूक-२०२०, चा निकाल दिनांक १० जानेवारी २०२० रोजी जाहीर झाला असून, खालील अनुसूचित दर्शविलेला उमेदवार नगर परिषद अध्यक्ष म्हणून निवडून आलेला आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | निवडून आलेल्या अध्यक्षाचे नाव | नगर परिषदेचे नाव | शेरा (जर अध्यक्षाचे पद आरक्षित असेल तर कोणासाठी) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | टेकाम सविता सुरेश | गडचांदूर | अनुसूचित जमाती (महिला) |

चंद्रपूर :
दिनांक १६ जानेवारी २०२०.

**राहुल कर्डिले,**
जिल्हाधिकारी, चंद्रपूर.

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २४.

## BY COLLECTOR

*ORDER*

No. Desk-10-UDB-Karyasan-1-Ele.-12-2020.—

In exercise of the power conferred on me under Section 19(*1*) and Section 51A-1A(*9*) of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965. I, Rahul Kardile, Collector, Chandrapur District hereby publish the name of persons who have been declared elected in the Direct Election to the post of President 2020, held on 09th January 2020. Result declared on 10th January 2020, as President of the Municipal Council, Gadchandur shown against their name.—

SCHEDULE

| Sr. No. | Name of the Elected President | Name of Municipal Council | Remarks (whether the post of President is reserved, if so, for whom) |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1 | Tekam Savita Suresh | Gadchandur | Scheduled Tribes (Women) |

Chandrapur :
Dated the 16th January 2020.

RAHUL KARDILE,
Collector, Chandrapur.

---

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २५.

## जिल्हाधिकारी, यांजकडून

**आदेश**

क्रमांक कार्या-१०-नविशा-कार्यासन-१-निवड-१३–२०२०.—

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १९(१) व ५१अ-१अ(९) चे अधिकाराचा वापर करून मी, राहुल कर्डिले, जिल्हाधिकारी, चंद्रपूर या प्रगटनाद्वारे असे जाहीर करतो की, गडचांदूर नगर परिषदेच्या दिनांक ०९ जानेवारी २०२० रोजी घेण्यात आलेल्या सदस्य पदाची निवडणूक-२०२०, चा निकाल दिनांक १० जानेवारी २०२० रोजी जाहीर झाला असून, खालील अनुसूचित दर्शविलेले उमेदवार त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या/नमूद केलेल्या प्रभागातून नगर परिषद सदस्य म्हणून निवडून आलेले आहेत.

**अनुसूची**

| अ. क्र. | निवडून आलेल्या उमेदवारांची नावे | प्रभाग क्र. | जागा क्र. | शेरा (जर पद आरक्षित असेल तर कोणासाठी) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | वांढरे अर्चना शिवाजी | १ | १ (अ) | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| २ | मोरे रामसेवक सतुजी | १ | १ (ब) | सर्वसाधारण |

**अनुसूची**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ३ | ताकसांडे जयश्री राहुल | २ | २ (अ) | अनुसूचित जाती (महिला) |
| ४ | डोहे अरविंद तुकाराम | २ | २ (ब) | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ५ | निमजे कल्पना अरुण | ३ | ३ (अ) | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| ६ | येरणे विक्रम नामदेव | ३ | ३ (ब) | सर्वसाधारण |
| ७ | कांबळे अश्विनी सचिन | ४ | ४ (अ) | अनुसूचित जाती (महिला) |
| ८ | जोगी शरद सुरेश | ४ | ४ (ब) | सर्वसाधारण |
| ९ | मेश्राम अरविंद सुभाष | ५ | ५ (अ) | अनुसूचित जमाती |
| १० | गोरे वैशाली सुनिक | ५ | ५ (ब) | सर्वसाधारण (महिला) |
| ११ | एकरे मिनाक्षी अशोक | ६ | ६ (अ) | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| १२ | शेख सरवर शेख शालू | ६ | ६ (ब) | सर्वसाधारण |
| १३ | उमरे राहुल नारायण | ७ | ७ (अ) | अनुसूचित जाती |
| १४ | रजिया सुल्ताना शेख खाजा | ७ | ७ (ब) | सर्वसाधारण (महिला) |
| १५ | कोडापे सुनिता बंडू | ८ | ८ (अ) | अनुसूचित जमाती (महिला) |
| १६ | ठाकूरवार सागर सुरेश | ८ | ८ (ब) | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| १७ | अहिरकर किरण सुधाकर | ८ | ८ (क) | सर्वसाधारण (महिला) |

चंद्रपूर :
दिनांक १६ जानेवारी २०२०.

**राहुल कर्डिले,**
जिल्हाधिकारी, चंद्रपूर.

---

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २६.

## BY COLLECTOR

*ORDER*

No. Desk-10-UDB-Karyasan-1-Ele.-13-2020.—

In exercise of the power conferred on me under Section 19(*1*) and Section 51A-1A(*9*) of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965. I, Rahul Kardile, Collector, Chandrapur District hereby publish the name of persons who have been declared elected in the General Election to the post of Member of Council 2020, held on 09th January 2020.

Result declared on 10th January 2020, as Councillors of the Municipal Council, Gadchandur shown against their name.—

SCHEDULE

| Sr. No. | Name of the Councillor elected | Prabhag No. | Seat No. | Remarks (whether the ward is reserved, if so, for whom) |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | Wandhare Archana Shiwaji | 1 | 1 (A) | BBC (Women) |
| 2 | More Ramsevak Satuji | 1 | 1 (B) | General |
| 3 | Taksande Jayashree Rahul | 2 | 2 (A) | SC (Women) |
| 4 | Dohe Arvind Tukaram | 2 | 2 (B) | BCC |
| 5 | Nimaje Kalpana Arun | 3 | 3 (A) | BCC (Women) |
| 6 | Yerne Vikram Namdev | 3 | 3 (B) | General |
| 7 | Kamble Ashwini Sachin | 4 | 4 (A) | SC (Women) |
| 8 | Jogi Sharad Suresh | 4 | 4 (B) | General |
| 9 | Meshram Arvind Subhash | 5 | 5 (A) | ST |
| 10 | Gore Vaishali Sunik | 5 | 5 (B) | General (Women) |
| 11 | Ekare Minakshi Ashok | 6 | 6 (A) | BCC (Women) |
| 12 | Shaikh Sarvar Shaikh Salu | 6 | 6 (B) | General |
| 13 | Umare Rahul Narayan | 7 | 7 (A) | SC |
| 14 | Rajiya Sultana Shaikh Khaja | 7 | 7 (B) | General (Women) |
| 15 | Kodape Sunita Bandu | 8 | 8 (A) | ST (Women) |
| 16 | Thakurwar Sagar Suresh | 8 | 8 (B) | BCC |
| 17 | Ahirkar Kiran Sudhakar | 8 | 8 (C) | General (Women) |

Chandrapur :                                                RAHUL KARDILE,
Dated the 16th January 2020.                                Collector, Chandrapur.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.